MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं. दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात



अंबाजोगाई शहर पोलीस स्टेशन अंतर्गत व पोलीस निरीक्षक घोळवे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक शाखेचे पीएसआय श्री घोडके साहेब यांच्या सहा त्याचा स्टॉप महिला पोलीस कर्मचारी सारिका सोळंके व पोलीस पोलीस अंमलदार त्रिंबक फड व पोलीस अंमलदार बाळासाहेब पारवे साहेब यांनी आज दिनांक १३.२.२०२५ रोजी शहरातील वाहतूक नियम न पाळणाऱ्या ऑटो रिक्षा तथा दुचाकींवर कारवाई केली यामध्ये १९ ऑटो रिक्षा व दोन टू व्हीलर मोटरसायकल यांचा समावेश आहे आंबेजोगाई शहरात तथा तालुक्यातील अनेक गाड्यावर बिगर पासिंग तथा फॅन्सी नंबर प्लेटमुळे आंबेजोगाई शहर पोलीस स्टेशनच्या पथकाने आज कारवाई केलेली दिसली त्यामुळे शहरातील नागरिकांन मध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०२ | अंक -१४९ | गुरुवार दि.१३ फेब्रुवारी २०२५ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -149 | THURSDAY DT.13 FEBRUARY 2025 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# बीडचे पालकमंत्री अजित पवार यांनी बीड नगर परिषदेचे फाटकं लुगडं एकदा बघावं?

## निंता अंधारे व गणेश पगारेच्या आशिर्वादाने पगारेची लाडकी लेक घेतेय मुंबईच्या घरी बसून फुकट बीड न. प कडून पगार



- गणेश पगारे च्या लाडक्या लेकीला नेता अंधारे गणेश पगारे च्या आशीर्वादाने मुंबईमध्ये राहून बीड नगर परिषदेत स्वच्छता कर्मचारी असताना काम न करताच पगार का दिली जाते.
- गणेश पगारे काढतो स्वत:च्या मुलीचीच पगार घाण उचलायला दुसरे कर्मचारी आणि पगार घ्यायला बापलेकीं मोकळे.
- नीता अंधारे गणेश पगार यांचा अनेक प्रकरणांमध्ये बीड नगर परिषदेमध्ये घोटाळे आहेत या घोटाळ्याचे लुगडं नेमकं आता अजित दादा पवार यांच्या हातात गेल्यामुळे बीड नगर परिषदेच्या भ्रष्टाचाराला वाचा फुटणार आहे विरोधी पक्षाचे नेते आमदार संदीप क्षीरसागर व विद्यमान महायुतीतील आमदार सुरेश धस व शिवसेनेचे जिल्हाप्रमुख यांनी नीता अंधारे गणेश पगारे यांना केलेला सहकार्य हे अजित दादांना माहिती झालेला आहे त्यामुळे आता
- बीड नगर परिषदेचे फाटक्या लुगडं बघितलं तर त्याला ठिगळ ही बसणार नाही नीता अंधारे गणेश पगाऱ्यांनी कोट्यावधी रुपयाचा केलेला भ्रष्टाचार आणि नोकरी खरेदी विक्री प्रकरणात अजित पवार लक्ष घालतील अशी विश्वसनीय सूत्रांनी माहिती दिलेली आहे दैनिक महाराष्ट्र आरंभच्या बातमीची अजित पवारांकडून दखल! गणेश पगारेच्या लाडक्या लेकीला बीड नगरपरिषद देते मुंबईमध्ये बसून पगार.
- मुंबईच्या अकाउंटला पगार जमा . अजित दादा सिओ निता अंधारे गणेश पगारे चा नंगानाच एकदा डोळे उघडून तुम्ही पाहावचं.
- अजित दादा न. प मुख्याधिकारी निंता अंधारे गणेश पगारेचा नंगानाच उघड्या डोळ्यांनी पालकमंत्री म्हणून एकदा बघाच.
- बीड नगर परिषदेमधील अवैध कर्मचारी गणेश पगारेची लाडकी लेक फुकट घेते. स्वच्छता कर्मचारी नावालाच. मुख्यधिकारी निंता अंधारे आंधळेपणाचा आवं आणत स्वच्छता कर्मचारी बीड नगर परिषद मध्ये आणि पगार मुंबईच्या बॅकेत.

**बीड /प्रतिनिधी**

**नगरपरिषदेचा अकाउंटंट गणेश पगारे अवैधरित्या मुलीला नोकरी मिळून दिलेली आहे. आणि मुलगी मुंबईमध्ये बसून बापाच्या आशीर्वादाने पगार घेते बीड नगरपरिषेकडून महिन्याला पगार बीड नगर परिषदेच्या गणेश पगारेनी आपल्या मुलाला आणि मुलीला नोकरी दिलेली आहे ड्युटी . गणेश पगारे स्वत:च्या मुलीलाच पगार देत असल्यामुळे अनेक कर्मचाऱ्यांमध्ये नाराजीचा सूर व्यक्त होत आहे. बीड शहरांतील नगर परिषद कार्यालयात स्वच्छता कर्मचारी म्हणून नोकरीला असताना सुद्धा स्वच्छता कर्मचारी म्हणून कधीही कुठलीही नाली घाण उचलताना काम कलताना अकाउंटंट गणेश पगारे ची लाडकी लेक दिसलेली नाही. परंतु तिला दर पगार महिन्याच्या महिन्याला मुबई मधील बॅक अकाऊंट ला जमा करतात आणि तिच्या जागेवरती दुसरी महिला काम करते असं बोललं जात परंतु तसं नसताना सुद्धा त्या ठिकाणी ती महिला कर्मचारी गणेश पगारेची मुलगी ही बीड नगर परिषदेमध्ये स्वच्छता कर्मचारी म्हणून वावरत आहे परंतु तिला ड्युटीवर न येताच अकाउंटट गणेश पगारे बाप या नात्याने तिची पगार काढतो आणि त्यावरती नगर परिषदेच्या मुख्याधिकारी नितां अधारे चक्क सही करून तिची पगार महिन्याला देतात नीता अंधारेचा घोटाळा हा बीड नगर परिषदेमध्ये भारतामध्ये नंबर एकला कोणती महिला अधिकारी कर्मचारी भ्रष्ट असेल तर ती नीता अंधारे म्हणून ओळखली जाईल असंही बीड शहरातील नागरिकांमध्ये चर्चेला उधान येत आहे.**

बीड /प्रतिनिधी

भंगी समाजातील महिलेला पैशाची आम्हीच देत मिळवली गणेश पगाऱ्यांनी स्वत:च्या मुलीसाठी नोकरी मिळत पदाचा दुरुपयोग करून घेतला आहे बीड नगरपरिषद कोणत्या ना कोणत्या माध्यमातून आता चर्चेला येत आहे यातच बीड नगरपरिषद राजकीय नेत्यांपेक्षा जास्त ही लुटून खाण्यामध्ये बीड नगर परिषदेच्या मुख्य अधिकारी नीता अंधारे आणि गणेश पगारे हे दोन कर्मचारी सध्या बीडची नगरपरिषद आपापल्या घरी चालवत आहेत याचाच एक भाग म्हणून बीड शहरातील स्वच्छता राहावी म्हणून बीड नगर परिषदेने गेल्या अनेक वर्षांपासून स्वच्छता कर्मचारी हे मागासवर्गीय समाजातील असले पाहिजेत स्वच्छता कर्मचारी बीड शहरांमध्ये काम करत असताना यामध्ये प्रामुख्याने पाहिले तर दलित समाजातील मांग महार चांभार भंगी सह मागासवर्गीय समाजातील कर्मचारी हे रात्रंदिवस घाण उचलण्यामध्ये व्यस्त आहेत त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर त्यांच्या जागी त्यांच्या वारस हक्काप्रमाणे त्यांच्या वारसाला नोकरीत घेण्याचा अधिकार आहे परंतु बीड नगर परिषदेच्या मुख्य अधिकारी नीता अंधारे व गणेश पगारे यांनी वेगळा प्रकार बीड नगरपरिषद मध्ये नव्हे तर राज्याच्या महाराष्ट्र शासनामध्ये चालू आहे परंतु गणेश पगारे ला नोकरी बीड नगरपरिषद मध्ये आहे परंतु त्याला वारस हक्क सुद्धा नाही परंतु स्वत:ला वारस हक्क नसताना सुद्धा गणेश पगारीने आपला मुलगा आणि मुलगी या दोघांना सुद्धा बीड नगर परिषदेमध्ये नोकरी लावली आहे याचं गौड बंगाल काय आहे हे पाहणे गरजेचे आहे वारस हक्क नसताना सुद्धा आपल्या पाल्याला नोकरी कशी लावली तर ती एका भंगी समाजातील नोकरी ही वारस हक्क एका बाँड व आधारे दाखवत

गणेश पगारे याना वारसाहक्क नाहीच.

बीड नगरपरिषद कशी लुटायची हे गणेश पगारे यांच्याकडून शिकायला पाहिजे बीड नगर परिषदेमध्ये स्वच्छताचे टेंडर, पाणीपुरवठ्याचे टेंडर, भाजी मंडई मधील टेंडर बांधकाम परवानाच पंतप्रधान रमाई घरकुल योजनेचा टेबल पाणीपुरवठा दुरुस्तीचे टेंडर विद्युत विभागाचे टेंडर सार्वजनिक बांधकाम विभागातील नगरपरिषद मधील टेबल घरपट्टी नळपट्टी दुरुस्तीचा टेबल वसुलीचा टेबल आणि राजकीय बदल्यांचाही टेबल हा फक्त गणेश पगारी ठरवतो नीता अंधारी त्यावरती सही करतात आणि टक्केवारी घेऊन मोकळे होतात कोट्यावधी रुपयाचा बीड नगर परिषद मध्ये घोटाळा या अगोदर झालेला आहे या सर्वांचा मास्टरमाइंड असलेला गणेश पगारे हा बीड जिल्ह्याला राजकीय नेत्यांना का हवा आहे तर कोट्यावधी रुपयाची टक्केवारी नेते मंडळी ना पाहिजे म्हणून बीड शहरातील लाखो रुपयांची दररोज होणारी वसुली ही गणेश पगारीच्या माध्यमातून होत आहे बीड शहरांमध्ये सुमारे १००० बांधकाम परवाने हे गणेश पगारे च्या आशीर्वादाने देण्यात आलेले आहेत. बीड शहरातील सपूर्ण नगर परिषदेच्या अवैध परवाने बांधकाम असतील किंवा कुठलाही परवाना बीड नगर परिषद असेल ते गणेश फुटलेला असताना सुद्धा त्या भिंगामध्ये नीता अंधारे या तोंड का बघत आहेत स्वत:चे तोंड बघत असताना राजकीय नेतेही त्या भिंगामध्ये आपला चेहरा बदलून टक्केवारी मिळवत आहेत. गणेश पगारे नी लाज सोडली आहे का नगर परिषदेच्या सेवानिवृत्त महिला कर्मचारी भंगी समाजाची नोकरी स्वत:च्या मुलीला मिळवून घेतली आर्थिक तडजोड करून महिलेला पैशाचे आमिष दाखवले व नौकरी स्वत:च्या मुलीला मिळून घेतली संबंधित मुलगी ही मुंबईमध्ये राहत असून गणेश पगारे च्या मुलीला मुंबईच्या बांद्रा येथील बँक अकाउंट मध्ये थेट पगार महिन्याच्या महिन्याला जातो नोकरी करायची नाही स्वच्छता विभागांमध्ये घाण उचलायचे नाही आणि पगार फुकट उचलायची आणि पगारही लेकीची गणेश पगारेच बाप काढतो त्यामुळे याची सकल चौकशी होणे गरजेचे आहे. मुख्यधिकारी नीता अंधारेच्या आशीर्वादाने सर्व काही चाललेला आहे. त्यामुळे मुख्याधिकारी नीता अंधारे गणेश पगारे यांची बदली व सखोल चौकशीची गरज आहे. बीड नगर परिषदेमध्ये



अनेक तक्रारी आमदार यांनी केलेली शिफारशी गणेश पगारे ला बीड घेण्यासाठी कोण कोण लोक आहेत व गणेश पगारेच्या मुला मुलींच्या नोकरीसह अनेक घटना या बीड नगर परिषदेमध्ये घडलेले आहेत कुठं कुठं कोणता चा भ्रष्टाचार मुखधिकारी नीता अंधारे गणेश पगारे चा नगा नाच उघड्या डोळ्यांनी बीडचे पालकमंत्री अजित पवार यांनी उघड्या डोळ्यांनी पहावं एवढेच आता बाकी राहिलेला आहे आणि कारवाई करावी तसेच दैनिक महाराष्ट्र आरंभ काही तक्रारदारांची दखल अजितदादा पवार घेणार असल्याची विश्वासने सूत्रांनी माहिती दिलेली आहे.

# अबॅकस जागतिक सर्वोत्कृष्ट यशस्वी विद्यार्थिनी आरोही दादाराव उजगरेला

## सर्वोत्कृष्ट जागतिक चॅम्पियनशिप चॅम्पियन अबॅकस स्पर्धक मानद साईटेशन

बीड (प्रतिनिधी)

यशस्वी अबॅकस विद्यार्थ्यांची तयारी करण्यासाठी अबॅकसला अतिशय महत्त्व प्राप्त झाले आहे. शालेय स्तरावरील सर्वांगिन विकास करण्याच्या मार्गाने अबॅकस गणितीय पध्दतीचा उपयोग होत असून शहरातील अबॅकस ट्रेनिंग केंद्राद्वारे, आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय , राज्य स्तरावर, अबॅकस चॅम्पियनशिप आयोजित केल्या जातात. जानेवारी २०२५ मध्ये झालेल्या जागतिक स्तरावरील अबॅकस चॅम्पियनशिपमध्ये आरोही दादाराव उजगरेने ऐतिहासिक यश संपादन केलेले आहे. आरोही दादाराव उजगरेने पाच मिनिटांमध्ये शंभर प्रश्न सोडवल्यामुळे समाजातील सर्व स्तरातून हार्दिक अभिनंदन होत असून चॅम्पियनशिप-चॅम्पियन म्हणून विद्यार्थ्यांनिचा शहरातील प्रतिष्ठित व्यक्तींद्वारे सत्कार करण्यात आलेला असून २७ मे २०२५ महिन्यामध्ये होणाऱ्या लंडन अबॅकस चॅम्पियनशिपसाठी आरोही दादाराव उजगरेची निवड करण्यात आलेली आहे. वर्ल्ड अबॅकस चॅम्पियनशिप स्पर्धेमध्ये भारत, ऑस्ट्रेलिया, मलेशिया, अमेरिका, तैवान, चीन, जपान, सिंगापूर अशा जगातील ११ देशातील १९४३ एकूण विद्यार्थ्यांपैकी आरोही दादाराव उजगरेची चॅम्पियनशिप चॅम्पियन फर्स्ट यश मिळवून जागतिक स्तरावर निवड झालेली आहे. इंटरनॅशनल अबॅकस स्पर्धेमध्ये ब्रेन किड्स स्तरावरील प्रतिष्ठित समजले जाणारी अबॅकस इंटरनॅशनल सर्वोत्कृष्ट जागतिक विद्यार्थ्यांचे प्रथम यशस्वी विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाच्या कार्यक्रमांमध्ये अबॅकस मास्टर ट्रेनर डॉ घोडके सर प्रमुख अतिथी म्हणून उत्कृष्ट गणितीय शिक्षक श्री संतोष शेकडे यांनी सत्कार करून यशस्वी विद्यार्थ्यांनी गेल्या चार ते पाच महिन्यापासून सतत प्रयत्न केल्यामुळे यश मिळालेले आहे असे प्रतिपादन केले तसेच अबॅकस तंत्रामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होतो आणि बुद्धिमत्तेचा सर्वोत्कृष्ट विकास होतो असे विशेष मार्गदर्शन डॉ. घोडके एस ए. यांनी विद्यार्थ्यांच्या भविष्यातील शैक्षणिक अडचणींना सामोरे जाण्यासाठी अबॅकसचा उपयोग होऊन अबॅकस स्मार्ट वर्क प्रयत्नांची स्तुती केली आहे. आरोही उजगरेचे वडिलांनी यशस्वी विद्यार्थ्यांना पालकांनी शिक्षकांनी सतत योग्य ते मार्गदर्शन करून आरोहीला यश प्राप्त करण्यास सहकार्य केलेली आहे. आरोही दादाराव उजगरेची ऑनलाइन लंडन अबॅकस २७ मे २०२५ महिन्यामध्ये होणाऱ्या जागतिक अबॅकस चॅम्पियनशिप करीता आरोही उजगरे विद्यार्थ्यांची निवड झालेली आहे असे जिल्हा अबॅकस वितरक एस. ए. घोडके यांनी सांगितले.

शालेय विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास तसेच विद्यार्थ्यांचा गणितामधील आवड निर्माण होऊन गणिताबद्दलची मनात असलेली भीती नष्ट होऊन अनेक क्लिष्ट अशा गणितीय पद्धती सोप्या पद्धतीने सोडवल्यासाठी विद्यार्थ्यांना आत्मविश्वास, स्मरणशक्ती यांचा विकास करण्यासाठी अबॅकसचा उपयोग केला जातो असे जिल्हा अबॅकस वितरक घोडके एस ए यांनी सांगितले आहे

# वैयक्तिक लाभाच्या योजनेकरिता ग्राम सभेच्या ठरावाचा निकष रद्द करा - वंचित बहुजन आघाडी

बीड ।प्रतिनिधी

विशेष घटक योजना, ओटीएसपी, रमाई घरकूल योजना या योजना अनु.जाती व जमातीच्या लाभार्थ्यांना अर्थ सहाय्य देवून त्यांची उन्नती करण्यासाठी शासनामार्फत विविध योजना राबविण्यात येतात. सदरील योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज सादर करतांना ग्रामसभेचा ठराव जोडावा असे नमूद केले जाते. ग्रामसभेचा ठराव अर्ज भरण्यासाठी अनिवार्य असल्यामुळे अनेक लाभार्थी अर्ज भरण्यापासून वंचित राहतात. गावपातळीवरील राजकीय हेवेदावे तसेच जातीय समीकरण यातून निर्माण झालेले विविध समूहाचे गट यामुळे अनू. जाती व जमातीच्या लाभार्थ्यांना ग्रामसभेचा ठराव मिळविणे जिकरीचे जाते. भारतीय समाज हा जातीय व्यवस्थक असल्यामुळे गावातील राजकारणामध्ये अनु.जाती व जमातीच्या समुहाला दुय्यम वागणूक देण्यात येते. कोणत्याही योजनेचा लाभ देण्यासाठी गावातील पुढारपण करणारे नेतृत्व मी तुम्हाला लाभ मिळवून देतो अशी उपकाराची व वर्चस्वाची भावना ठेवतो. त्यामुळे या समूहाला अंकित ठेवण्यासाठी गावपातळीवर ग्रामसभेच्या ठरावाचा हत्यार म्हणून वापर केला जातो हे सर्व ज्ञात आहे. त्यामुळे विघयो, ओटीएसपी, रमाई घरकुल आवास योजना अशा प्रकारच्या योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी व अनु. जाती व जमातीच्या लाभार्थ्यांना याचा निरपेक्षपणे लाभ मिळण्यासाठी ग्रामसभेचा ठराव ही अट रद्द करणे आवश्यक आहे. ग्रामसभेचा ठराव ही अट रद्द केल्यामुळे अनु. जाती व जमातीचा लाभार्थी गावातील जातीय मानसिकतेला बळी पडणार नाही. गावातील राजकीय पुढाकाऱ्याकडून त्यांची होणारी आर्थिक लूट अवहेलना व कुचंबना बंद होईल व स्वाभिमानाने योजनेचा लाभ घेता येईल.

रमाई घरकुल आवास योजना ग्रामीण भागासाठी तुटपुंजी अनुदान दिले जाते. वाढती महागाई पाहता अनुदानाची रक्कम वाढवत ती ५ लाख रुपये पर्यंत करण्यात यावी अशी मागणी करण्यात येते. महात्मा फुले विकास महामंडळाला गेल्या अनेक वर्षापासून कसलाही प्रकारचा निधी दिलेला नाही करिता महात्मा फुले विकास महामंडळाला निधी द्यावा अशी मागणी करण्यात येत आहे. अशी मागणी वंचित बहुजन आघाडी बीड जिल्ह्याच्या वतीने करण्यात आली आहे त्यावेळी जिल्हाध्यक्ष अजय सरवदे, युवक जिल्हाध्यक्ष अनुरथ वीर, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष अनितताई चक्रे, सम्यक विद्यार्थी आंदोलन जिल्हाध्यक्ष रोहन मगर, पुष्पाताई तुरुकमाने, ज्ञानेश्वर कवठेकर, अर्जुन जवंजाळ, डॉ.गणेश खेमाडे, भारत तांगडे,लखन जोगदंड, मिलिंद सरपते,पुरुषोत्तम वीर, राजेश कुमार जोगदंड, सचिन मेघडंबर, किरण वाघमारे, पप्पू गायकवाड, बाळासाहेब गायकवाड राहुल शिरोळे, प्रदीप उबाळे, संदीप जाधव, वंश शिंदे, अंशुमन शिंदे, राज शिंदे, आनंद शिंदे, स्वप्निल शिंदे, देवा गव्हाणे राजेंद्र कांबळे ज्ञानेश्वर शिंदे अन्वर सय्यद अहमद पठाण, उमेश गुळवे सिद्धार्थ आगे कैलास वीर नवनाथ गायकवाड ज्ञानेश्वर हवाले राजेंद्र पोकळे प्रेम कांबळे विष्णू दादा देवकते भीमराव अवसरमल अमोल आहेर बोराडे महाराज, धम्मानंद साळवे, अंकुश जाधव यांच्यासह असंख्य पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.






# बावीच्या शेतकऱ्याचे बाजरीचे सरमाड जाळले

## पोलिसांत तक्रार-चौकशीची मागणी

प्रशांत बाफना । शिरूरकासार

तालुक्यातील बावी येथील शेतकरी अर्जुन रामभाऊ राऊत यांच्या शेतातील अज्ञात व्यक्तीने बाजरीचे सरमाड जाळले असून या प्रकरणी त्यांनी पोलिसांत तक्रार दाखल करून चौकशीची मागणी केली आहे.अर्जुन राऊत यांची ब्रह्मनाथ येळंब शिवारात गट नंबर ३५२ आणि ३५३ मध्ये शेतजमीन असून या जमिनीत ते नेहमी बाजरी,ज्वारीचे बुचाड लावत असतात.यापूर्वी त्यांच्या शेतात असा कधीच प्रकार घडला नाही.परंतु ९ फेब्रुवारी रोजी दुपारी एक वाजता बाजरीचे सरमाड जळत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.जवळपास पाचशे पेंढ्यापेक्षा जास्त पेंढ्या जळाल्या असून मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.या प्रकरणाची चौकशी करून भविष्यात असा प्रकार होऊ नये यासाठी त्यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली आहे.

# माता रमाई आंबेडकर जयंती व माघ पौर्णिमा महत्वाचे आयोजन

बीड ।प्रतिनिधी

बीड शहर व परिसरातील धम्मप्रेमी सर्व बौद्ध उपासक उपासिका यांना कळविण्यात येते की प्रतिवर्षाप्रमणे याहिवर्षी त्यागमुर्ती माता रमाई आंबेडकर यांच्या जयंती महोत्सवाच्या निमित्ताने व माघ पौर्णिमेच्या अनुषंघाने प्रियदर्शी धम्म संस्कार शिक्षण संस्था बीडच्या वतीने विविध कार्यक्रमाचे अयोजन महाविहार धम्मभूमी डॉ.भदन्त आनंद कौसल्यायन नगर शिवणी ता. जि.बीड या ठिकाणी गुरुवार दि.१३ फेब्रुवारी २०२५ रोजी दु.ठिक १२:०० वाजता करण्यात आले आहे. यावेळी प्रमुख धम्मदेसना पु.भिक्खु महाविरो थेरो,(काळेगांव,अहमदपूर) यांची लाभणार आहे तर मी रमाई बोलतेय हे एकपात्री नाट्य प्रयोग रमाईकार कु.डॉ.वैभवी कांबळे ( घारगांवकर,लातुर ), सादर करणार आहेत. याप्रसंगी विविध सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. ज्यांना सहभाग नोंदवायचा आहे त्यांनी संपर्क साधावा व आपली नांव नोंदणी करावी. नांव नोंदणी व दान जमा करण्यासाठी संपर्क: अलकाताई डोंगरे-९०२१७८६३३१, वंदनाताई वाघमारे-९२८४९७६८१९, पंचशीलाआई सरपते- ९५१८७११९३६, शितलताई पालके-७२४८९६६२२७, ऋतुजा डोळस-९३७०११५८६१ कार्यक्रमाप्रसंगी उपासिका मंगलताई सोनवणे बीड यांच्या परिवाराच्या वतीने उपस्थित सर्वांना खीरदान देण्यात येणार आहे. तरी हजारोंच्या संख्येने धम्मप्रेमी उपासक-उपासिका यांनी कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन कार्यक्रमाचे मुख्य संयोजक व प्रियदर्शी धर्म संस्कार शिक्षण संस्था बीड चे सचिव पु.भिक्खु धम्मशील थेरो, (महाविहार धम्मभूमी शिवणी)

# पखालीला इंजेक्शन भरपूर झालेत आतातर डायरेक्ट हाल्याला ढोस देऊन टाका - शेख अजिमोद्दीन

## उप कार्यकारी अभियंता यांच्या कडे प्रतितास ५०रूपये नुकसानभरपाई चे अर्ज करावे

आष्टी (सुरेश कांबळे)

आष्टी तालूक्यात महावितरण कंपनीत तूघलकी कारभार सुरू आहे. राज्यकर्त्यांना याचे सोयरसुतक नाही.उलट राजाश्रय आहे कि काय हेच कळत नाही.घरगूती विज ग्राहकांना पूर्ण क्षमतेने चोवीस तास विज पुरवठा देणे बंधनकारक आहे. तसेच कृषी पंपाना पूर्ण क्षमतेने आठ तास विज पुरवठा देणे बंधनकारक आहे.मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना महाराष्ट्र शासन निर्णय दिनांक २५जूलै २०२४नूसार शासनाने राज्यातील ४४ लाख ३ हजार शेतकऱ्यांच्या ७.५ अश्वशक्तीपर्यंतच्या शेतीपंपाना पूर्णत: मोफत विज पूरवली जाईल याकरिता १४ हजार ७६० कोटी रूपये महावितरण कंपनीला देण्यात आले आहेत.म्हणजेच शेतकऱ्यांनी आपले विज बील भरले आहे.महाविरण कंपनीचे शेतकऱ्यांचे विज बील आज रोजी शून्य रूपये आहे व यापूढेही शून्यच राहणार आहे.शेतकऱ्यांना शून्य वीज बील वाटपासाठी सबस्टेशन मध्ये विज बील आले होते परंतु ते वाटप केले गेले नाही.ऑनलाईन आपला ग्राहक नंबर टाकून आपले शून्य विज बील प्रत काढता येते.पिम्पळा सबस्टेशन मधून व तसेच तालुक्यातील जवळपास सर्वच सबस्टेशन मधून अत्यंत कमी दाबाने वीज पुरवठा केला जात आहे. पिंम्मळा सबस्टेशन मधून घरगुती विज पुरवठा सिंगल फेज बंद करण्यात आला आहे.शेतीपंपाना अत्यंत कमी दाबाने व मनमानी पध्दतीने वेळेत बदल करत विज पुरवठा केला जात आहे.सबस्टेशनमध्ये अधिकृत कर्मचारी हजरच राहत नाहीत जिसकी लाठी ऊसकी भैंस अशी परिस्थिती आहे.सबस्टेशनचा अधिकृत मोबाईल नंबर बंद करून ठेवला आहे.ज्यूनिअर अभियंता धानोरा व उप कार्यकारी अभियंता आष्टी हे सामान्य शेतकऱ्यांचे फोन उचलत नाहीत. अभियंते उंटावरून शेळ्या हाकत आहेत. राजकिय नेते याबाबत या अभियंत्यांना जाब विचारत नाहीत.तरी आता निवेदन, आंदोलन करून पखालीला इंजेक्शन देण्याऐवजी शेतकऱ्यांनी आपले विज बील आता भरलेले आहे व आपण आता थकबाकीदार नाहीत. तसेच घरगूती विज ग्राहकांनी व शेतीपंपधारकांनी आता एकत्रित येऊन उप कार्यकारी अभियंता आष्टी यांचे कडे शेती पंपाना कमी दाबाने वीज पुरवठा केला व पूर्ण आठ तास विज पुरवठा केला नाही म्हणून विज कायदा२००३ नूसार प्रति तास ५० रूपये या प्रमाणात नुकसान भरपाई द्यावी. म्हणून रितसर अर्ज दाखल करून पोहच घ्यावी व त्याचप्रमाणे घरगूती विज ग्राहकांनी अत्यंत कमी दाबाने व २४ तास विज पुरवठा केला गेला नाही म्हणून आपला अर्ज उपकार्यकारी अभियंता कडे करा अर्जात आपला ग्राहक नंबर व मोबाईल नंबर जरूर टाकावा. विज वितरण कंपनीचे कर्मचारी तूमचे आकडे आहेत हे सांगताना दिसतात त्यांना घाबरून जाऊ नका महावितरण कंपनीने आता सर्व शेती पंपाचे विज कोटेशन भरून घेतले पाहिजे जेणेकरून कंपनीला त्या शेतकऱ्यांचे शासनाकडून विज बील मिळेल व कंपनी अधिक नफ्यात येईल . विज पूरवठा सूरळीत हवा असेल तर आता पखालीला इंजेक्शन देण्याऐवजी हल्यालाच ढोस देऊन मारले पाहिजे. शेती पंपधारक व घरगुती विज ग्राहक या सर्वांना विनंती आहे की आपण विजेच्या मनमानी कारभाराला आळा घालण्यासाठी उपकार्यकारी अभियंता यांचेकडे प्रती तास ५०रूपये नूकसान भरपाई द्यावी म्हणून रितसर अर्ज दाखल करून त्याची प्रत शेतकरी संघटनेकडे द्यावी.शेतकरी संघटना हे सर्व अर्ज घेऊन उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्याचा मानस आहे . महावितरण कंपनीला कूणाचे अभय हे माहीत नाही . तरी कृपया जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी अर्ज दाखल करून शेतकरी संघटनेकडे एकप्रत जमा करावी असे आव्हान शेतकरी संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष शेख अजिमोद्दीन केले आहे.

# डॉ.जाकेर हुसेन यांच्या जयंती निमित्त अमन लान्स बीड येथे अखिल भारतीय कवी संमेलन संपन्न

बीड ।प्रतिनिधी

अखिल भारतीय उर्दु कवी संमेलनाचे आयोजन दि ०८ फेब्रुवारी वार शनिवार रोजी अमन लान्स बार्शी रोड बीड येथे सायं ०७:०० ते रात्री १०:०० वा.पर्यंत करण्यात आले होते. या कार्यक्रमाची सुरुवात हाफेज मोहम्मद कासिम अन्सारी यांनी कुराण मजीद पठन करुन केली.हम्द व नात ए पाक शेर-ए-हिंद ग्रुप ऑफ़ महाराष्ट्र राज्यचे संस्थापक अध्यक्ष शेख आमेर पाशा यांनी पठन केले.या कवी संमेलना मध्ये अखिल भारतीय सुप्रसिद्ध कवी नईम अख्तर खादमी बुरहानपुर ( चझ ),राहत इंदौरी यांचे पुत्र सतलज राहत इंदौरी ( इंदोर ),ताहेर सऊद बिजनौर ( णझ ),कलीम जावेद खिरतपुरी( णझ ),बीडचे प्रसिद्ध कवी शाहनवाज खान आझाद,अलतमश तालेब नांदेड,जुबेर गोहर परभणी या सर्वांनी गजल,कविता,शायरी केली व सुत्रसंचालन ऐहतेशाम सफ़ी परभणी यांनी केले.हा कवी संमेलन फारोख अली पटेल साहेब माजी उपनगराध्यक्ष यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलं. या वेळी प्रमुख पाहुणे मोईन मास्टर साहेब, शफीख भाऊ ,शेख तय्यब भाई संपादक बीड रिपोर्टर,पठाण जलील खाँन,पठाण जैतुल्लाह खाँन,हाजी नसीम इनामदार,खुर्शीद आलम साहेब,बरकत लाला,मुख्तार काँट्रेक्टर,सय्यद मजहर भाई,सरपंच सय्यद शाहेद भाई,अमर शेख सर,हाशम पठाण खामगावचे अमीर साहेब,शाहीन पठाण अध्यक्षा क्रांती म.अ.का. यु.म.राज्य,शेख गुलरुख जहिन उपस्थित होते.हा उर्दु कवी संमेलन भारताचे ३ रे राष्ट्रपती भारतरत्न डॉ.जाकेर हुसेन यांच्या जयंतीनिमित्त ठेवण्यात आले होते.या कवी संमेलनाचे आयोजन बीड शहराच्या तरुण मंडळींनी केले होते. या उर्दु कवी संमेलनाला यशस्वी करण्यासाठी बीडचे कवी शाहनवाज खान आझाद,शेर-ए-हिंद ग्रुप ऑफ़ महाराष्ट्र राज्यचे संस्थापक अध्यक्ष शेख आमेर पाशा,शेख इलियास युनुस,फयाज कुरेशी,शेख अनिस यांनी परिश्रम घेतले व आभार प्रदर्शन शाहनवाज खान यांनी केले.



# द मीडिया व्हॉईसच्या तालुका अध्यक्ष पदी अविनाश इंगावले यांची सर्वानूमते निवड

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील विविध वृत्तमान पत्र तसे साप्ताहिक,युट्यूब,वेब पोर्टलच्या सर्व संपादक पत्रकार यांची बैठक नुकतीच पार पडली व सर्वाच्या मतानुसार द मीडिया व्हॉईस च्या नावाची घोषना करण्यात आली तसेच या बैठकीत सर्वानुमते संपादक अविनाश इंगावले यांची अध्यक्षपदी निवड जाहिर करण्यात आहे. गेल्या पंदरा वर्षापासून गेवराई तालुक्यात विविध राज्य दैनिक तसेच डिजिटल युगात यशस्वी भरारी घेतली असल्या कारणाने व सर्वासोबत मैत्रीपुर्ण संबंध कायम प्रस्तापित करून गेवराई तालुक्यातील शहरी व ग्रामिन भागातील पत्रकार यांना कुठेही भेदभाव न करता चांगली कामगिरी संपादक अविनाश इंगावले यांनी केली असल्याने सर्वाच्या वतिने पत्रकार सुभाष शिंदे,व शेख जावेद यांनी संपादक अविनाश इंगावले यांच्या नावाची सुचना मांडली तसेच त्याला पत्रकार सोमनाथ मोटे व संपादक सय्यद बादशाह यांनी अनूमोदन केले तसेच नुकत्याच पार पडलेल्या बैठकीत संपादक अविनाश इंगावले अध्यक्ष ,कार्यध्यक्ष शेख जावेद,उपाध्यक्ष सुभाष शिंदे,सचिव सोमनाथ मोटे,संघटक सय्यद बादशाह यांची निवड प्रक्रीया जाहिर करण्यात आली असून सदस्यपदी श्याम जाधव,नवनाथ आडे,शेख अफरोज,शेख खाजा,अमोल भांगे,लक्ष्मण उमाप,सय्यद रेहान,देवराज कोळे,शेख मोहसिन,गणेश ढाकणे,अफसर शेख,ईम्राण सौदागर,शुभम घोडके,यांची सदस्य पदी निवड करण्यात आली आहे तसेच झालेल्या निवडी बद्दल संपादक अविनाश इंगावले यांच्यावर सुभेच्छाचा वर्षाव होत आहे.



# वाढदिवसा निमित्त शाळेत शैक्षणिक साहित्यासह भिंतीवरील घड्याळाचे वाटप

माजलगाव ।प्रतिनिधी

मौजे ब्रम्हगाव जिल्हा परिषद शाळेचा माजी विध्यार्थी आदित्य रामेश्वर शेंडगे याच्या कुटुंबाने शाळेतील अंगणवाडी बाल विध्यार्थ्यांना पाटी पेन्सिल व इयत्ता पहिली ते चौथीतील विध्यार्थ्यांना घड्याळ तसेच अंगणवाडी इमारती मध्ये भिंतीवरील घड्याळ व जिल्हा परिषद शाळेत एक भिंतीवरील घड्याळ काँग्रेस नेते दत्ता कांबळे यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

यावेळी वाढदिवसाचा आवढव्य खर्चाला बगल देत सामाजिक जाणीवतून नाशिक येथे अभियांत्रिकीचे शिक्षण घेत असलेल्या आदित्य रामेश्वर शेंडगे याच्या संकल्पनेतू हा उपक्रम राबावण्यात आला. यावेळी राष्ट्रीय काँग्रेस अनु जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांच्या हस्ते सर्व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी काँग्रेस नेते दत्ता कांबळे यांनी आदित्य शेंडगेला वाढदिवसाच्या शुभेच्छा देत, शेंडगे कुटुंबाचे सामाजिक उपक्रमाबद्दल अभिनंदन करत सर्वांनी विध्यार्थ्यांना प्रेरणा आणि प्रोत्साहन मिळावं असे सामाजिक उपक्रम करावेत असे आवाहन केले. यावेळी मुख्याध्यापक मुरलीधर गवळी सर, आदित्यचे आई उर्मिला शेंडगे,वडील माजी सरपंच रामेश्वर शेंडगे यांच्या सह शालेय समिती अध्यक्ष बबिता कांबळे, अंगणवाडी सेविका, कांचन सानप मॅडम, शिल्पा कांबळे मॅडम, नितीन कांबळे सह विध्यार्थी उपस्थित होते.




# सांगली जिल्ह्यातील ४ वर्षाच्या चिमुरडीवर अत्याचार करुन खुन करणार्या नराधमाला तात्काळ फाशी द्या

## माजलगाव तहसीलदारला सामान्य नागरिकांनी मिळुन दिले निवेदन

माजलगाव ।प्रतिनिधी

सांगलीजिल्ह्यातील जत येथील करगणी गावातील ४ वर्षाच्या चिमुरडीवर अत्याचार करुन खुन करणार्या आरोपीला १५ दिवसांत दोषारोपपत्र सादर करुन फास्टट्रॅक कोर्टात खटला चालवुन आरोपीला तात्काळ फाशी द्या अश्या प्रकारचे निवेदन माजलगाव तहसीलदार यांना सामान्य नागरिकांनी दिले.

सांगली जिल्ह्यातील जत येथील करगणी या छोट्याश्या गावी ४ वर्षाच्या चिमुरडीचा अत्याचार करून तिचे तुकडे करून खून करण्यात आला आहे.वय वर्ष ४ असलेल्या मुलीला काय समज असणार ?? अंगणात खेळत असणाऱ्या पांडुरंग या नराधमाने तिला फूस लावली. मुलीची आई डिलिव्हरी साठी दुसऱ्या गावात गेली होती घरात फक्त तिची आज्जी होती. नातं बाहेर खेळत असेल म्हणून ती आत कामं करत होती. परंतु बाहेर असणाऱ्या नराधम पांडुरंग याने डाव साधला. आमिष दाखवत एका पत्र्याच्या खोलीत नेऊन त्याने चिमुकलीवर लैंगिक अत्याचार करुन तिचा खून केला.दारू पिलेला हा नराधम त्या चिमुकलीला लपवण्यासाठी तेथील एका लोखंडी पेटीचा आधार घेत तिचा मृतदेह त्या पेटीत टाकला. दुसरीकडे नातं हरवली म्हणून आज्जी सर्वत्र मुलीचा शोध घेत होती. सर्वत्र शोधाशोध सुरु होती. पोलिसांना पाचारण करण्यात आले होते. काही अंतरावर हा क्रूरकर्मा दारू पिऊन तर्रर होता. पोलिसांनी त्यांचा खाक्या दाखवताच त्याने गुन्हा कबूल केला.नातीचा मृतदेह पाहताच आज्जीने हंबरडा फोडला. ४ वर्षीय मुलीची हत्या झाल्याचे कळताच संपूर्ण जत शहर सुन्न झाले होते. सर्वांची पायाखालची वाळू जणू घसरली होती. दुर्दैवी आज्जीचे रडणे आणि आक्रोश जत च्या माणुसकीच्या अभेद्य भिंती भेदत न्यायाची भीक मागत होत्या. क्रूर पांडुरंग याला फाशीची शिक्षा होण्यासाठी, आता सांगली जिल्हा एकवटला असून जत बंद चे नियोजन केले आहे.४ वर्षीय चिमुकली परत येणार नाही पण संवेदना हरवलेल्या या जगात प्राणाची किंमत शून्य आहे, याची जाणीव अंगाला शहारे देणारी ठरत आहे. या आरोपीला फाशी होण्यासाठी फास्टट्रॅक कोर्टात केस चालवावी. अरब देशात बलात्कार / खून प्रकरणात आरोपीला दोन दिवसात तात्काळ फाशीची शिक्षा देण्यात यावी जत मध्ये घटना घडली असून अशी घटना कोणत्या गावात किंवा जिल्हात घडणार नाही याची काळजी घेऊन आरोपीला तात्काळ केस फास्टट्रॅक कोर्टात चालवुन आरोपीला तात्काळ फाशी देण्यात यावी अश्या प्रकारचे निवेदन माजलगाव तहसीलदार यांना देण्यात आले ह्यावेळी शेख रशिद,शौकत शेख, मुश्ताक कुरैशी,नसीर पठाण,जानुशहा शेख व सामान्य नागरिक उपस्थित होते.



# जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ



जिल्हा परिषद माध्यमिक शाळा चौसाळा शाळेत इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता सर्वप्रथम मान्यवराचे हस्ते दीप प्रज्वलन व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापिका श्रीमती पद्मजा हंपे, या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून शालेय समितीचे अध्यक्ष विनोद शिंदे, माजी प्राचार्य श्री लक्ष्मणराव कवडे सर, जि प प्राथमीक शाळा हिंगणी शाळेचे मुख्याध्यापक श्री पी एस आंधळे, नवजीवन पतसंस्थेचे संचालक श्री महारुद्र झोडगे सर, ज्येष्ठ शिक्षक श्री सुभाष काकड, शालेय पोषण चे विभाग प्रमुख श्री विजय कोळेकर, वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर , पोलीस कर्मचारी श्री हरके तसेच वरिष्ठ शिक्षक श्री सुभाष काकड सर विज्ञान विभाग प्रमुख विनायक तोताडे सर, सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री लक्ष्मण राऊत मंचावर उपस्थित होते मान्यवरांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी व येणाऱ्या दहावीच्या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका पद्मजा हांपे यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांच्या भविष्यातील प्रत्येक पाऊल खुणा यशस्वी होवो आणि आपल्या आयुष्यात उंच भरारी घ्यावी हीच आमची शुभेच्छा असल्याचे मत व्यक्त केले यावेळी विद्यार्थ्यांनी शाळेबद्दल आपले मनोगत व्यक्त केले तसेच काही विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनातील आठवणींना उजाळा दिला व कठोर मन करून जात असल्याची खंत व्यक्त केली, इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी शाळेसाठी साऊंड सिस्टिम सेट भेट दिला कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नववीतील विद्यार्थिनी मृणाली विद्यागर, सलोनी कोळेकर, आरोही शिंदे, महेक मुलाने या विद्यार्थिनींनी केले, तर कार्यक्रमाचे प्रस्ताविक इयत्ता नववीतील विद्यार्थी शुभम शिंदे व आभार प्रदर्शन सागर माने या विद्यार्थ्यांनी केले, दहावीतील विद्यार्थ्यांसाठी जेवणाची व्यवस्था श्रीमती सत्यभामा सोनवणे मावशीने व त्यांच्या सहकाऱ्यांनी केली, या कार्यक्रमासाठी शाळेतील शिक्षक श्री विजय कोळेकर, तंत्रस्नेही शिक्षक श्री सुधीर जाधव, श्री रामचंद्र भोसले, उध्दव घोडके योगानंद गांधले, संतोष परतापुरे, वैभव शिंदे सर, प्रशांत वायभट, श्री भागवत नाडे, सुरेश गोरे, ज्येष्ठ शिक्षिका श्रीमती शालिनी काकडे, मोहर जोगदंड, शकुंतला तांबडे, माधुरी इनकर, अलका गुजर, शुभांगी जोशी, उषा माने, कल्पना गायकवाड, मोटे मॅडम सर्व शिक्षक वृंद इतर कर्मचारी उपस्थित होते.

# एनएमएमएस परिक्षेत जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा कडा नंबर १ चे सुयश




कडा (प्रतिनिधी)

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या राष्ट्रीय आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक शिष्यवृत्ती परिक्षेमध्ये आष्टी तालुक्यातील कडा येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा कडा नंबर १ या शाळेचे १६ विद्यार्थी व ११विद्यार्थीनी असे २७ जणांनी घवघवीत यश संपादन केले.या यशाबद्दल त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. या शाळेचा शैक्षणिक दर्जा नेहमीच चांगला राहिलेला असून या शाळेचा तालुक्यात शैक्षणिक क्षेत्रात नावलौकिक आहे. शैक्षणिक तसेच कला, क्रीडा या क्षेत्रात देखील येथील विद्यार्थी नेहमीच चमकदार कामगिरी करताना दिसतात. यावर्षीच्या एनएमएमएस परिक्षेमध्ये वनवे यशराज जगदीश,अनारसे अथर्व राजू,कु.सय्यद रुकैय्या बिलाल,ओतारी अनिकेत अमित,

तिवारी अनंत संतोष,पठाण जैद खालेद,कु.गुंजाळ ज्ञानेश्वरी भारत,पोकळे पार्थ अजिनाथ ,थोरवे समर्थ दिनेश, थोरात सार्थक सुदाम,चव्हाण माऊली कल्याण,चव्हाण ओम अनिल,कु.वामन सृष्टी संतोष, कु.गुंजाळ अबोली प्रवीण, कन्हेरकर संस्कार लहू,कु.तांबोळी उजमा फिरोज,कु.पोकळे वैष्णवी हरिभाऊ,कु.काकडे अमृता बापू,पठाण आवेज आयाज,कु.चितळे गौरी रघू,करांडे कृष्ण महेश,कु.भोसले समृद्धी शरद,ओव्हाळ आदित्य ज्ञानेश्वर,कु.पवार अनुष्का विनोद,देसाई समर्थ भीमराव,साळवे प्रेम प्रदीप,कु.शिरोळे रुपाली गणेश या विद्यार्थी- विद्यार्थिनींनी नेत्रदीप यश मिळविले. या यशाबद्दल मुख्याध्यापक पाचारणे सर ,करडुले सर, सातव मॅडम सर्व मार्गदर्शक शिक्षक व शिक्षकेत्तर वृंद तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष,उपाध्यक्ष सह समितीचे सर्व पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. २७ विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या या यशाबद्दल पालक तसेच ग्रामस्थांनी शाळेचे शिक्षक व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# एस.एम.युसूफ़ यांनी महेदवीया दायरा कब्रस्तान च्या समस्या मांडल्या



## ऑल इंडिया मुस्लिम ओबीसी संघटनेचे प्रदेश सल्लागार ड. उस्मान मोरवे यांनी दिले ठोस आश्वासन

बीड ।प्रतिनिधी

शहरातील मोमीनपुरा भागात असलेले महेदवीया दायरा कब्रस्तान च्या अनेक समस्या आणि प्रश्न मुक्तपत्रकार तथा महेदवीया समाजाचे विश्वस्त एस.एम.युसूफ़ यांनी ऑल इंडिया मुस्लिम ओबीसी संघटनेचे प्रदेश सल्लागार ड. उस्मान मोरवे यांच्यासमोर मांडल्या. मोरवे यांनी सर्व बाबी, समस्या आणि प्रश्न ऐकून यावर निश्चितपणे कार्य करू असे ठोस आश्वासन दिले.ड. उस्मान मोरवे हे उस्मानाबादहून बीडला आले होते. ते ऑल इंडिया मुस्लिम ओबीसी संघटनेचे प्रदेश सल्लागार असून महेदवीया समाजाचे विश्वस्त देखील आहेत. बीड येथील मोमीनपुरा भागात असलेले ४५० वर्षांचे ऐतिहासिक महेदवीया दायरा कब्रस्तान गेल्या अनेक वर्षांपासून अनेक समस्यांच्या विळख्यात सापडलेले आहे. येथे सर्वप्रथम कब्रस्तानच्या संरक्षक भिंती बांधणे आवश्यक आहे. मात्र बीडच्या महेदवीया जमातकडे यासाठी आवश्यक निधी नसल्याने कब्रस्तानला मोठी अवकळा आली आहे. याकरिता युसूफ़ हे २०१४ पासून सतत संघर्षरत आहेत परंतु या संघर्षाला अजूनही प्रत्यक्ष कार्याचे फळ मिळालेले नाही. ही बाब ड. मोरवे यांच्या निदर्शनास आल्याने त्यांनी बीड येथे येऊन युसूफ़ यांची भेट घेत महेदवीया दायरा कब्रस्तान विषयी सखोल माहिती घेतली. तसेच मुस्लीम महेदवीया समाजाच्या समस्या, शिक्षण, नोकरी, व्यवसाय, विविध शिक्षण घेणारे विद्यार्थी यांचे प्रश्न, जात प्रमाणपत्र, वैधता प्रमाणपत्रासाठी येणाऱ्या अडचणी बाबत देखील सखोल चर्चा केली. तसेच एकत्रितरित्या समाजासाठी निश्चितपणे चांगले कार्य करू असे म्हटले. यावर एस.एम.युसूफ़ यांनी त्यांचे आभार व्यक्त केले. या बैठकीत सोलापूर येथील मुश्ताक बोराटे यांची उपस्थिती होती.

# रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया च्या बिड जिल्हा अध्यक्ष पदी संघरक्षित ऊर्फ बाळासाहेब पांडुरंग काकडे यांची नियुक्ती

## पंडित टोमके मराठवाडा प्रदेश अध्यक्ष तसेच महाराष्ट्र अध्यक्ष जकप्पा कांबळे यांनी बिड येथे केली मोठी घोषणा

**रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया च्या वतीने राष्ट्रीय नेते डॉ राजेंद्र गवई यांचे आदेशानुसार दिनांक १० फेब्रुवारी २०२५ रोजी बिड येथील कार्यकर्ते यांनी शासकीय विश्राम गृह येथे जिल्हा शाखेचे प्रमुख पदाधिकारी यांची महत्व पुर्ण बैठकीचे आयोजन केले होते यावेळी महाराष्ट्र राज्य अध्यक्ष जक्कपा कांबळे साहेब व मराठवाडा प्रदेश अध्यक्ष पंडित टोमके साहेब यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असणारे सोलापूर जिल्हा अध्यक्ष धर्मा माने साहेब, सोलापूर शहर प्रमुख बिराजदार साहेब तसेच गायकवाड साहेब यांची देखील उपस्थिती लाभली.**

यावेळी सूत्रसंचालन आदरणीय मोरे सर यांनी कार्यक्रमाचे




सूत्रसंचालन केलं तसेच यावेळी अधिकृत घोषणा करताना राष्ट्रीय नेते डॉक्टर राजेंद्र गवई साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पंडित टोमके साहेब मराठवाडा प्रदेशाध्यक्ष आणि महाराष्ट्र अध्यक्ष जेकप्पा कांबळे साहेब यांनी भाषणातून बाळासाहेब काकडे यांच्या जिल्हाप्रमुख पदाची जाहीर घोषणा केली. यावेळी तालुक्यांचे इच्छुक पदाधिकारी भारत शिरसाट टाकणखार जीवक जाधव मगर साहेब साहेबराव काकडे संजय शिरसाट पप्पू काकडे पंकज जाधव आशिष जाधव आरुष मोरे असंख्य कार्यकर्त्यांनी उपस्थिती दर्शवली



# वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने पोलिस स्टेशनला निवेदन

## पत्रकार पिसाळ यांच्यावर प्राणघातक हल्ला

हल्लेखोरांवर कठोर कारवाई करा

वडवणी / प्रतिनिधी

पत्रकार प्रसाद पिसाळ यांच्यावर खुनी हल्ला करणा-या आरोपीवर गंभीर कारवाई करण्यात यावी. या मागणीसाठी वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने वडवणी पोलीस स्टेशनमध्ये निवेदन देऊन मागणी करण्यात आली आहे. सांगली जिल्ह्यातील विटा येथील पत्रकार प्रसाद पिसाळ यांच्यावर खुनी हल्ला करण्यात आला आहे. पत्रकार पिसाळ यांच्या वर हल्ला करणा-या आरोपीवर गंभीर कारवाई व्हावी. या मागणीसाठी अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त मा.श्री.एस.एम.देशमुख सर यांच्या आदेशानुसार संपूर्ण राज्यात पोलिस स्टेशन मध्ये निवेदने दिली जात आहेत. त्याअनुषंगाने डिजिटल मिडिया परिषदेचे राज्य अध्यक्ष अनिल वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने वडवणी पोलीस स्टेशनमध्ये रितसर तक्रारी निवेदन दाखल करण्यात आले आहे. या निवेदनात असे ही म्हटले आहे की,आपल्या पोलिस स्टेशनच्या माध्यमातून सदर प्रकरणी वरिष्ठांना याबाबत तातडीने कळवुन योग्य ती कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे. या निवेदनावर डिजिटल मिडिया परिषदेचे राज्य अध्यक्ष अनिल वाघमारे,वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषदेचे जेष्ठ मार्गदर्शक सुधाकर पोटभरे,तालुकाध्यक्ष सतिश सोनवणे सचिव महेश सदरे, डिजिटल मिडिया परिषदेचे तालुका अध्यक्ष ओमप्रकाश साबळे, उपाध्यक्ष धम्मपाल डावरे, कोषाध्यक्ष वाजेद पठाण, पत्रकार गितांजली लव्हाळे,पत्रकार विजय राऊत, पत्रकार अतुल जाधव, पत्रकार संभाजी लांडे, पत्रकार हरी पवार सह आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# मानेवाडी सार्वजनिक शिवजयंती महोत्सवाच्या अध्यक्षपदी सुधीर आवारे तर उपाध्यक्षपदी राहुल जाधव यांची निवड



चौसाळा ।प्रतिनिधी

प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी कुळवाडी भुषण राजाधिराज छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सार्वजनिक जयंती निमित्त बीड तालुक्यातील मानेवाडी येथे भरत माने पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली या बैठकीमध्ये अध्यक्षपदी सुधीर संजय आवारे तर उपाध्यक्षपदी राहुल जाधव तर सचिवपदी रमेश मोरे यांची एकमताने निवड करण्यात आली. मार्गदर्शक म्हणुन बाळासाहेब माने, रमेश माने, प्रशांत माने, अविनाश माने, दत्ता माने, विकास मोरे, शहाजी इंगोले, विशाल आवारे, तानाजी मोरे, अशोक टाके, माणिक माने ,सिध्देश्वर माने,अमर माने,रंजित माने,अक्षय माने,प्रकाश माने,किशोर जगताप यांची निवड करण्यात आली.

# शिदोड येथील शैलेश दिलीप जोगदंड याची महसूल सहाय्यक पदी निवड



बीड (प्रतिनिधी)

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून शिदोड ता.जि.बीड या गावातील सुपुत्र शैलेश दिलीप जोगदंड याने एम.पी.एस.सी. या परीक्षेमध्ये कठोर मेहनत, चिकाटी, परिश्रम घेऊन आणि त्यामध्ये सातत्य ठेवत यश प्राप्त केले.शैलेश जोगदंड यांने आपल्या आई वडिलांच्या कष्टाची परिश्रमाची जाणीव ठेवत दिवसरात्र अभ्यास करून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत घवघवीत यश मिळवत मंत्रालयात महसूल सहाय्यक पद मिळवले. शैलेश जोगदंड च्या या यशामध्ये आई-वडिलांसह मोठ्या भावंडांचा देखील मोठा वाटा आहे. शैलेश जोगदंड हे पत्रकार नितीन जोगदंड यांचे पुतणे आहेत. यश मिळवलेल्या शैलेश वर मित्रपरिवार नातेवाईक आणि गावातील प्रतिष्ठित नागरिक तसेच परिसरातील लोकांकडून शुभेच्छांचा वर्षा होत असून पुढील कार्यासाठी खूप खूप शुभेच्छा देत आहेत.

# मुंबईतील विक्रोळी गोदरेज जागेवर माता रमाई यांचे भव्य स्मारक उभारण्यात यावे







## संदेश आंबेडकर यांची मागणी

मुंबई (प्रतिनिधी)

भारतीय संविधानाचे निर्माते महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाज आणि देशासाठी प्रचंड योगदान दिले आहे, त्यांना आयुष्यभर साथ देणारी माता रमाबाई भीमराव आंबेडकर यांचे मुंबईमध्ये विक्रोळी येथे भव्य दिव्य स्मारक उभे करण्यात यावे, अशी मागणी संविधान रिपब्लिकन पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष संदेश आंबेडकर यांनी केली असल्याची माहिती समाजभूषण डॉ. राजन माकनीकर यांनी दिली आहे.

परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आयुष्यभर साथ देणारी माता रमाई यांचे योगदान प्रचंड मोठे आहे. त्यांनी केलेला त्याग परिश्रम प्रचंड मोठे आहे. माता रमाई यांची जयंती जल्लोषात आणि उत्साहात साजरी केली जाते. याही पेक्षा मोठ्या स्वरूपात जयंती साजरी व्हावी, त्यांच्या कष्टा ची महंती सर्वदूर पोहोंचावी. त्यांना स्मरण करण्यासाठी मुंबईमध्ये स्मारक उभे राहावे, अशी संपूर्ण महाराष्ट्रातील महिलांची मागणी आहे.माता रमाबाईंचा त्याग हा संपूर्ण महिलांना कळावा एक आदर्श समाजासमोर उभा रहावा, यासाठी हे स्मारक महत्त्वपूर्ण असल्याची माहिती बाबासाहेब आंबेडकरांचे पणतू संदेश आंबेडकर यांनी दिली. याबाबत लवकरच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार असल्याचे माहिती संविधान रिपब्लिकन पार्टीचे संस्थापक महासचिव डॉ. राजन मकणीकर यांनी दिली.

# पंकजांसमोर राखेतील गुन्हेगारांचा पाढा

## संपर्कमंत्री म्हणून वादग्रस्त बाबींवर भाष्य टाळले



छत्रपती संभाजीनगर : राखेच्या अवैध धंद्यातील गावगुंडांनी सुरक्षा रक्षकास केलेली मारहाण, औष्णिक वीज केंद्रावर केलेली दगडफेक, पुढे वाहने अंगावर घालण्यापासून ते अर्धमेला करेपर्यंत केलेल्या मारहाणीचा २०१९ पासूनच्या गुन्हेगारीचा चढा आलेख मांडणारी परळीमधील ४० गुन्ह्यांची यादीच महानिर्मितीच्या अधिकाऱ्यांनी संपर्कमंत्री पंकजा मुंडे यांच्यासमोर मांडली. पहिल्याच बैठकीत राखेतील गैरप्रकार समोर आल्यानंतर पंकजा यांनी पर्यावरण रक्षण एवढीच आपली भूमिका आहे, असे म्हणत राखेतील व्यवहार आणि गुन्हेगारीतून अंग काढून घेतले.

राखेतील गुन्हेगारांविषयी जिल्हाधिकाऱ्यांसह विविध विभागांना केलेल्या ४२ हून पत्रांच्या जंत्रीमधील एका मजकुरात ३४४ अवैध राखेच्या व्यवहारातील वाहनांची यादीही प्रशासनास दिल्याचे परळी औष्णिक वीज केंद्राच्या मुख्य अभियंत्यांनी नमूद केले. राखेतील गैरव्यवहारांची माहिती सादर झाल्यानंतर पंकजा ही माहिती मुख्यमंत्र्यांपर्यंत पोहोचवली की नाही, हे स्पष्ट होऊ शकले नाही.

'अराजकाच्या वर्तुळा'तील बीडमधील वस्तुस्थिती 'लोकसत्ता'ने समोर आणल्यानंतर आता राखेच्या अवैध धंद्यातील तपशील अधिकारी सरकारच्या वरिष्ठांपर्यंत मांडू लागले आहेत. पंकजा यांच्यासमोर करण्यात आलेल्या सादरीकरणात कोरडी आणि ओली राख यातील निविदांची माहिती देण्यात आली आहे.

गावगुंडांची दहशत

कोरडी राख उचलण्यासाठी १२ निविदाधारक पात्र असून त्यांचे काम सुरळीत करत असल्याचे सांगण्यात आले. वीजनिर्मितीवेळी कोळसा जाळल्यानंतर उरलेल्या राखेवर पाणी मारले जाते. ती ओली राख घेण्यासाठी १८ निविदाधारकांना पात्र वाहतूकदार म्हणून निवडले होते. ही ओली राख परळी औष्णिक वीज केंद्राच्या तलावात साठवली जाते, तेथून निविदाधारकांना ती राख उचलू द्यायची असते. पण तसे घडत नाही. गावगुंडांची ही दहशत संपर्कमंत्र्यांच्या समोर सांगितली.

# मोफत योजनांमुळे लोक काम करेनात

## सर्वोच्च न्यायालयाने सरकारला फटकारले

प्रतिनिधी । बीड



निवडणुकीच्या आधी सरकारकडून मोफत योजनांची खैरात केली जाते. अनेक आश्वासनं दिली जातात. यावर आता सर्वोच्च न्यायालयाने नाराजी व्यक्त केलीय.सर्वोच्च न्यायालयाचे म्हणणे आहे की, मोफत योजनांमुळे लोक काम करायला तयार नाहीत. न्यायालयाने बुधवारी शहरी परिसरात बेघरांशी सबंधित प्रकरणी सुनावणी केली. या प्रकरणी आता पुढील सुनावणी ६ आठवड्यांनी होणार आहे.सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती बीआर गवई, न्यायमूर्ती जॉर्ज मसिह यांच्या पीठाने शहरी परिसरात बेघरांना घराच्या अधिकाराशी संबंधित प्रकरणी सुनावणी केली. न्यायमूर्ती गवई म्हणाले की, दुर्दैव आहे, मोफत योजनांमुळे लोक काम करण्यास तयार नाहीत. त्यांना राशन मोफत मिळतंय, कोणतंही काम न करता पैसे मिळतायत.

आम्ही त्यांच्या अडचणी समजू शकतो पण त्यांनी समाजाच्या मुख्य प्रवाहात येणं हे चांगलं होणार नाही का? त्यांनाही देशाच्या विकासाला हातभार लावण्याची संधी मिळायला हवी असं सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं. सरकारकडून मोफत योजना दिल्यानं लोक काम करत नाहीयेत. यामुळे देशाच्या विकासातही त्यांचं योगदान नसल्याचीच खंत न्यायालयाने व्यक्त केलीय.

अटॉर्नी जनरल आर व्यंकटरमणि यांनी न्यायालयात सांगितलं की, केंद्र सरकार शहरी गरिबी उन्मलून मिशन राबवण्याच्या तयारीत आहे. या अंतर्गत शहरी भागातील बेघरांना निवाऱ्याची व्यवस्था आणि इतर मुद्द्यांवरही तोडगा काढला जाईल. यावर हे शहरी गरीबी उन्मूलन मिशन कधीपर्यंत लागू केलं जाईळ असा सवाल सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला विचारला.

# धनंजय मुंडेंच्या अडचणी वाढल्या

## अजित पवारांचे महत्त्वाचे आदेश

प्रतिनिधी । बीड

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मिक कराड हा अटकेत असून तो मंत्री धनंजय मुंडे यांचा अत्यंत निकटवर्तीय आहे.यामुळे धनंजय मुंडे देखील सतत टार्गेट होत आहेत. या प्रकरणामुळे धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याची मागणी होत असून, विरोधकांनी त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप केले आहेत. यामुळे त्यांच्या अडचणी आणखी वाढणार असल्याची चर्चा आहे.संतोष देशमुख यांच्या अपहरण आणि हत्येच्या प्रकरणामुळे जिल्ह्यात कायदा-सुव्यवस्थेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. त्याचबरोबर, धनंजय मुंडे पालकमंत्री असताना बीड जिल्हा नियोजन समितीतील निधी वितरणात झालेल्या अनियमिततेबद्दलही आरोप होत आहेत. याच पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मागील दोन वर्षांमध्ये खर्च झालेल्या ८७७ कोटी रुपयांच्या निधीची चौकशी सुरू केली आहे.


भाजप आमदार सुरेश धस यांनी धनंजय मुंडेंवर जोरदार निशाणा साधत, परळी आणि आंबाजोगाई येथे २०२१-२२ या कालावधीत कोट्यवधी रुपयांची कामे न करताच बिले उचलल्याचा आरोप केला आहे. तब्बल ३७ कोटी ७० लाख रुपयांची बिले बोगस स्वरूपात काढण्यात आली, तसेच सार्वजनिक बांधकाम विभागातील नऊ कामांसाठी १३ कोटींची अनियमित बिले मंजूर करण्यात आली, मात्र प्रत्यक्षात कोणतेही काम झाले नाही, असा गंभीर आरोप त्यांनी केला आहे.

# राम मंदिराचे मुख्य पुजारी आचार्य सत्येंद्र दास यांचे निधन



प्रतिनिधी । अयोध्या

राम मंदिराच् मुख्य पुजारी सत्येंद्र दास यांचेचे निधन झाल्याचे वृत्त एएनआय या वृत्तसंस्थेनं दिले आहे. वयाच्या ८५ व्या वर्षी लखन पीजीआयमध्ये त्यांनी अखेरच श्वास घेतला. आचार्य सत्येंद्र दास यांना ब्रेन हॅमरेज झाल्यानंत ३ फेब्रुवारी रोजी गंभीर अवस्थेत लखनौ पीजीआयच्या न्यूरोलॉज वॉर्डच्या एचडीयूमध्ये दाखल करण्यात आले होते. आचार्य सत्येंद्र दास यांचे शिष्य प्रदीप् दास यांनी सांगितले की, दीघ आजारानंतर सकाळी आव च्या सुमारास लखनऊच्य पीजीआयमध्ये त्यांचे निधन झाले. त्यांचे पार्थिव् पीजीआयमधून अयोध्येत आणले जात आहे. शिष्यांनी त्यांचे पार्थिव अयोध्येत नेले आहे. उद्या अयोध्येतील सरयू नदीच्य तीरावर त्यांच्यावर अंत्यसंस्कान करण्यात येणार आहेत.



# खेळ तुमचा, रुबाब आमचा! भारताने इंग्लंडचा १४२ धावांनी केला पराभव: मालिका ३-० ने जिंकली

## शुभमन गिलचे शतक; हर्षित आणि अर्शदीला २-२ विकेट्स

प्रतिनिधी । बीड

भारताने तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात इंग्लंडचा १४२ धावांच्या मोठ्या फरकाने पराभव केला. यासह संघाने एकदिवसीय मालिका ३-० ने क्लीन स्वीप केली. इंग्लंडने बुधवारी अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियमवर गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. भारताने ३५६ धावा केल्या. प्रत्युत्तरात, इंग्लिश संघ ३४.२ षटकांत २१४ धावांवर सर्वबाद झाला.भारताचा सलामीवीर शुभमन गिलने शतक झळकावले. श्रेयस अय्यरने ७८, विराट कोहलीने ५१ आणि केएल राहुलने ४० धावा केल्या. हर्षित राणा, हार्दिक पंड्या, अक्षर पटेल आणि अर्शदीप सिंग यांनी प्रत्येकी २ विकेट घेतल्या. इंग्लंडकडून एकाही फलंदाजाला अर्धशतक करता आले नाही, आदिल रशीदने ४ बळी घेतले.विराट कोहलीने त्याचे अर्धशतक पूर्ण केले आहे. त्याने ५० चेंडूत अर्धशतक पूर्ण केले. विराट कोहलीचे हे ७३ वे अर्धशतक आहे. १८ व्या षटकात लियाम लिव्हिंगस्टोनच्या दुसऱ्या चेंडूवर धाव घेऊन त्याने आपले अर्धशतक पूर्ण केले.

# शीख विरोधी दंगली संबंधित सज्जन कुमार यांना शिक्षा

नवी दिल्ली: माजी खासदार सज्जन कुमार यांना १९८४ मध्ये शीखविरोधी झालेल्या दंगली संबंधित एका प्रकरणात दोषी ठरवण्यात आले आहे. शीख दंगली प्रकरणात दिल्ली न्यायालयाने नुकतीच सुनावणी केली. तब्बल ४१ वर्षांनी याप्रकरणी निकाल देण्यात आला आहे. यात काँग्रेसचे माजी खासदार सज्जन कुमार यांना दोषी ठरवले आहे.



आता येत्या १८ फेब्रुवारीला सज्जन कुमार यांच्या शिक्षेबाबत न्यायालय निर्णय घेणार आहे. माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर मोठी दंगल उसळली होती. त्यांच्या हत्येचा बदला घेण्यासाठी दिल्लीत प्रचंड जाळपोळ, लुटमार झाली होती. १ नोव्हेंबर १९८४ रोजी दिल्लीतील राजनगर पार्ट-१ मध्ये सरदार जसवंत सिंग आणि त्यांचा मुलगा तरुणदीप सिंग यांची हत्या करण्यात आली.

# लाडकी बहीण योजनेस मुख्यमंत्र्यांचा आश्वासक आधार

प्रतिनिधी । मुंबई



लाडकी बहीण योजना ही आमच्यासाठी केवळ आर्थिक मदत नाही, तर आमच्या जगण्याचा आधार आहे, असे धुणी भांडी करणाऱ्या महिलांनी सांगताच ही योजना कधीही बंद पडणार नाही अशी आश्वासनपर ग्वाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली. यवतमाळ जिल्ह्यातील घाटंजी येथील धुणी भांडी काम करणाऱ्या २० महिलांना रसिकाश्रय या संस्थाने जीवाची मुंबई, श्रमाची आनंदवारी या उपक्रमांतर्गत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सह्याद्री अतिथीगृह येथे भेट घडविली. मुख्यमंत्र्यांसह झालेल्या भेटीदरम्यान अनेक महिलांच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले. भांडे घासून मिळणाऱ्या ५०० रुपयांत कुटुंब कसं चालवायचं, याचा प्रश्न होता. पण लाडकी बहीण योजनेने आम्हाला मोठा आधार मिळाला, असे म्हणताना एक वृद्ध महिलेचा गळा दाटून आला.या भेटीनंतर महिलांच्या चेहऱ्यावर आनंद झळकत होता. 'मुख्यमंत्र्यांची भेट स्वप्नवत वाटली. लाडकी बहीण योजना कायम राहील, हे ऐकून समाधान झाल्याचे एका महिलेने सांगितले.

# अखेर मंत्र्यांना पीए, पीएस, ओएसडी मिळाले

## मंत्रिमंडळ विस्तारानंतर २ महिन्यांनी नियुक्त्या, मुख्यमंत्री फडणवीस यांनी मनमानीला लावला चाप

मुंबई /प्रतिनिधी

राज्य मंत्रिमंडळाच्या विस्तारानंतर जवळपास २ महिन्यांनी बहुतांश मंत्र्यांना खासगी सचिव, स्वीय सहाय्यक आणि विशेष कार्य अधिकारी मिळालेत. यासंबंधीचे शासनादेश काल उशिरा काढण्यात आले. पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अनेक प्रकरणांत मंत्र्यांनी शिफारस केलेली नावे वगळून त्यांचा प्रस्ताव परत पाठवला आहे. त्यामुळे आपल्या मर्जीतील अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याचा मंत्र्यांचा प्रयत्न उधळला गेला आहे. या मंत्र्यांना आता नव्याने प्रस्ताव पाठवावा लागणार आहे.

यासंबंधीच्या माहितीनुसार, ११ कॅबिनेट व राज्यमंत्र्यांकडील स्टाफला काल मंजुरी देण्यात आली. या नियुक्त्या रखडल्यामुळे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेच्या मंत्र्यांनी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत नाराजी व्यक्त केली होती. त्यानंतर लगेचच या नियुक्त्या करण्यात आल्यात. यापूर्वी ५ वेगवेगळे आदेश काढून पीए, पीएस, ओएसडी नेमण्यात आलेत. पण मुख्यमंत्र्यांनी यावेळी अनेक मंत्र्यांचे प्रस्तुत अधिकारी नेमण्याचे प्रस्ताव परत पाठवल्याची माहिती आहे.

दुसरीकडे, भाजपच्या एका ज्येष्ठ मंत्र्याने आपल्या मर्जीतील पीएस हवा यासाठी हट्ट धरला. हा मंत्री फडणवीस यांच्या जवळचा होता. पण त्याचाही हट्ट पुरवला गेला नाही. अन्य एक ज्येष्ठ मंत्रीही आपल्या पसंतीच्या नावासाठी अडून बसले होते. त्यामुळे त्यांनी सूचवलेल्या नावाची योग्य ती खातरजमा करून मगच त्याला मंजुरी देण्यात आली. भाजपच्या एका कॅबिनेट मंत्र्यांच्या बाबतीतही असाच प्रकार घडला.

### स्टाफ नसल्याने काम करता येत नसल्याची सुरू होती ओरड

उल्लेखनीय बाब म्हणजे सत्ताधारी महायुतीमधील भाजप, शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस या तिन्ही घटकपक्षांतील काही मंत्र्यांनी आपल्याला पीए, पीएस मिळत नसल्यामुळे कामच करता येत नाही अशी ओरड केली होती. त्यानुसार त्यांनी आपल्या मर्जीतील काही अधिकाऱ्यांची नावे रेटली होती. पण त्यातील अनेक नावांना मुख्यमंत्र्यांनी कात्री लावली आहे. त्यामुळे अजूनही चार ते पाच मंत्र्यांना पूर्ण स्टाफ मिळाला नाही. या मंत्र्यांना नव्याने शिफारस प्रस्ताव पाठवावा लागणार असल्याचे सांगण्यात येत आहे.



### ट्रॅक रेकॉर्ड तपासूनच झाल्या नियुक्त्या

महाविकास आघाडीच्या मंत्र्यांकडे असलेल्या अधिकाऱ्यांना घ्यायचे नाही, ज्यांचे ट्रॅक रेकॉर्ड चांगले नाही त्यांनाही घ्यायचे नाही अशा काही चाळण्या या नियुक्त्यांसंबंधी लावण्यात आल्या होत्या. त्यानुसार मंत्र्यांनी शिफारस केलेल्या अधिकाऱ्यांची पडताळणी करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे ओएसडी चंद्रशेखर वझे यांनी स्वतः अनेकांच्या मुलाखती घेतल्या. सूत्रांच्या माहितीनुसार, मुख्यमंत्री कार्यालयाने मंत्र्यांकडून शिफारस झालेल्या अधिकाऱ्यांची चौकशी केली. त्यांचे ट्रॅक रेकॉर्ड तपासले. विशेषतः यापूर्वी एखाद्या घोटाळ्यात त्यांचे नाव आले आहे का? याची तपासणीही केली.

### कोणत्या मंत्र्याला कोणते अधिकारी मिळाले?

सरकारच्या आदेशानुसार, माजी मंत्री दीपक केसरकर यांचे पीएस असणारे मंगेश शिंदे हे आता आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांचे पीएस झालेत. तर संतोष देशमुख हत्याकांडामुळे वादात सापडलेल्या धनंजय मुंडे यांना पूर्वीप्रमाणेच प्रशांत भामरे हे अधिकारी पीएस म्हणून मिळालेत. मुख्यमंत्री कार्यालयाने त्यांच्याविषयी बरीच चौकशी केल्यानंतर त्यांच्या नावाला मंजुरी देण्यात आली. पंकजा मुंडे यांना मंदार वैद्य पीएस म्हणून मिळालेत. तर सहकार विभागाचे वरिष्ठ अधिकारी संतोष पाटील हे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांचे पीएस म्हणून काम पाहतील. जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांचे पीएस म्हणून जयराज कारभारी हे कारभार पाहतील.




# बोगस कामाची चौकशी करून कार्यवाही करावी - शेख खिजर, जयदेव शिंगणे

तलवाडा ।प्रतिनिधी

तलवाडा ग्रामपंचायत अंतर्गत होत असलेले सिमेंट रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असून याची चौकशी करून संबंधितावर कार्यवाही करण्याची मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर सौदागर व जयदेव शिंगणे यांनी जिल्हाधिकारी बीड, मुख्य कार्यकारी अधिकारी जि प बीड,गट विकास अधिकारी गेवराई यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.कार्यवाही न झाल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल असा इशारा त्यांनी निवेदनात दिला आहे.

या बाबत सविस्तर असे की,मागील चार वर्षापासून तलवाडा ग्रामपंचायतीच्या कामात अनियमितता असून १५ व्या वित्त आयोगाच्या निधीमधून करण्यात आलेली कामे अत्यंत दर्जाहीन झाली आहे तसेच सद्या सुरू असलेलं सिमेंट रस्त्याचे काम ही निकृष्ट होत असून रस्त्यावर वापरण्यात येत असलेली खडी ही माती मिश्रित वापरण्यात येत आहे यामुळे रस्ता टिकणार नाही याबत ग्रामस्थांनी ग्रामसेवक आणि सरपंच यांना कळवले आहे परंतु सरपंच पती कामात हस्तक्षेप करत असून कुठे तक्रार करायची करा काही फरक पडत नाही असे वक्तव्य करत आहे. नरेगा कामात ही मोठा भ्रष्टाचार करण्यात आला असून याबाबत अनेक तक्रारी प्रलंबित आहेत या सर्व कामाची चौकशी करून संबंधितावर कार्यवाही करण्यात यावी नसता लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल याची दखल घ्यावी असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उपयुवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर सौदागर आणि जयदेव शिंगणे यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.